## भाग १ ते ५ मध्ये दाखल गुन्हयाची माहीती दिनांक

| अक्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपी | चोरीस गेलेला माल. | मिळाला माल. | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **नागपूर** 29/22 कलम 379 गुन्हयाचा प्रकार रोख चोरी | रे स्टे नागपुर PF NO 02/03 स्टाल वरून | 12/01/2022 17.00 वा. | 12/01/2022 22.29 वा. | देवेन्द्र किसनलाल चौरसिया उम्र 45धंदा - आरकेएस स्टाल मॅनेजर , निवासी जागनाथ बुधवारी , भारतमाता चौक के सामने नागपुर मो न 9422840947 | अज्ञात | **<u>एकुण</u> <u>११,७००/—रु</u>** रोख 11,700/- रू चा माल | एक संशईत गो—या रंगाची महिला जिने सोनेरी रंगाची सलवारसुट व अंगावर क्रिम कलरची शाल ओडलेली | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी मजकुर हे गेल्या पाच वर्षापासुन आरमएस्टॉल मध्ये मॅनेजर चे काम करतात, त्यांचा स्टॉल रे.स्टे. नागपूर प्लॅट फॉर्म नं. ०२,०३ वर मध्यभागी आहे. आज रोजी ते स्टॉल ड्युटी वर हजर होते. संध्याकाळी ५.००वा च्या जवळपास ते आपल्या धंदयाचे पैशे मोजत असताना एक गो—या रंगाची महिला जिने सोनेरी रंगाची सलवारसुट व अंगावर क्रिम कलरची शाल ओडलेली त्यांचे स्टॉल वर येवून काहि विचारपूस करित असताना पिण्याचे पाण्याची बॉटल मागितली असता फि।। यांनी त्यांचे पैसे गल्ल्यात ठेवून पाण्याची बॉटल दिली व तिने बॉटल चे पैशे देवून निघून गेली, व त्यांनतर आनखी दुसरे दोन गिराईक आले ज्यांनी त्यांचे पासुन सामान घेतले त्यादरम्यान त्यांनी त्यांचे गल्यामध्ये ठेवलेल्या पैशे बघितले तर ते दिसले नाही. फि।। हे पाण्याची बॉटल घेण्यासाठी मागे पलटले असता सदर संशयित महिलेने त्यांचे नजर चुकीचा फायदा घेवून सदर रोख गल्ल्यातून काढून चोरी करुन नेले वरुन फि।। यांनी सदर महिलेवर चोरीची लेखी तक्रार दिले वरुन कलम 379 ipc नंबरी गुन्हा दाखल आहे. | Wnk/779 भलावी |
| ०१ | **बडनेरा अप क्र.** 06/2022 कलम 306,34 भादवि आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे | रेल्वे स्टेशन वरुड प्लॅटफार्म नं 1 वर नरखेड साईडला | 21/12/21 21/55 वा.सुमारास | 12/01 /22 19/57 वा. | सतीश नामदेवराव तायवाडे वय — 41 वर्षे, व्यवसाय — मजुरी, जात — मांग (अनुसुचीत जात ) रा. ग्राम सुरळी ता. वरुड जि. अमरावती, मो.न.7263049 694 | 1) अंकीत ओंकारराव बारस्कर वय 29 वर्ष 2) हर्षद गांजरे वय 24 वर्ष 3) तेजस शिरभाते वय 24 वर्ष व आणखी एक व्यक्ती दाढी वाला अंकीत बारस्कर याचा मित्र वय माहीत नाही. **अटक नाहीत** | निरंक | <u>एकुण 12000/- रु</u> 1) एक लिवोसिन प्लँट ग्रोथ रेगुलेटर कं. ची विषारी बाटल 500 ml कि. 00/- , 2) Vivo कं चा स्त्रीन फुटलेला मोबाईल बंद स्थितीत त्यामध्ये VI कं चे सिम कार्ड नं 8055978434 अं. कि. 7000/- रु 3) Vivo कं चा मोबाईल सिम नसलेला IMEI nO 866085035295314, 866085035295306 कि. अं. 5000/- रु, 4) मयत महेश तायवाडे याचे MO सो यांनी दिलेले दोन व्हिसेरा सिलबंद बाटल कि. 00/- रु | अशा प्रकारे आहे की, रेपोस्टे बडनेरा येथील मर्ग क्र 23/2021 कलम 174 CRPC प्रमाणे चौकशीत असुन यामध्ये मयताने कोणतातरी विष घेवुन मयत झाला असे PM रिपोर्टवर निष्पन्न असुन मयताचे वडील यांनी पोस्टे ला येवुन त्यांचा मयत मुलगा यास वरुड येथील वरील नमुद असलेले आरोपी साथिदार यांनी त्यास त्रास दिला यावरुन त्याने मानसिक त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली. बाबत फिर्यादी यांनी तक्रार दिली ती पुढीलप्रमाणे<br>रिपोर्ट<br>सतीश नामदेवराव तायवाडे वय — 41 वर्षे, व्यवसाय — मजुरी, जात — मांग (अनुसुचीत जात ) रा. ग्राम सुरळी ता. वरुड जि. अमरावती, मो.न.7263049694<br>मी समक्ष पो.स्टे. ला येवुन जबानी रीपोर्ट देतो की, मी वर नमुद ठिकाणी माझी पत्नी नामे चित्रा सतीश तायवाडे हिचे सह राहत असुन मला दोन मुल आहेत त्यांची नावे 1) महेश उर्फ बंटी उर्फ करण तायवाडे वय — 21 वर्षे, (मयत), 2) प्रितम तायवाडे वय — 20 वर्षे असे मुल असुन त्यांची लग्ने झालेली नाहीत.<br>ता. 21/12/2021 रोजी संध्याकाळी 08.30 वा. चे दरम्याण मला माझे भाव-सासरे विनोद रमेशराव लोखंडे यांचा फोन आला व सांगीतले की, रेल्वे स्टेशन वरुड येथील बेंचवर बंटी पडुन आहे असे सांगीतल्यामुळे मी माझे पत्नी सह रेल्वे स्टेशन वरुड येथे जावुन खात्री केली असता तेथे पडुन असलेला मुलगा हा माझाच मोठा मुलगा बंटी तायवाडे होता व त्याचे बाजुला पॉयझन ची बॉटल व त्याचा मोबाईल पडुन होता व रेल्वे स्टेशनवर अंकीत बारस्कर याची गाडी क्रमांक — | PSI श्री. वरठे |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | असा एकुण 12000/- रु | MH 27 BY 2727 काळ्या रंगाची गाडी उभी होती. माझा मुलगा बंटी हा कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नव्हता. तेव्हा तीथे पोलीसवाले हजर होते. बंटी कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नसल्यामुळे बंटी ला तेथुन पोलीसांनी लोकांचे मदतीने ग्रामीण रुग्णालय वरुड येथे नेले तेथील डॉक्टर यांनी तपासुन सांगीतले की, माझा मुलगा बंटी हा मरण पावला आहे. तेव्हा पोलीस कार्यवाही चालु होती. माझा मोठा मुलगा बंटी उर्फ महेश उर्फ करण हा मरण पावला या बाबत माझे सांगणे आहे की, बंटी हा वरुड येथे त्याचा जवळचा मित्र अंकीत ओंकारराव बारस्कर वय – 28 वर्षे, रा. वरुड याचे सह मागील एक वर्षापासुन किरायाचे घरात राहत होता. ते काय काम करीत होते या बाबत मला काही माहीत नाही. मी अंकीतला विचारले असता त्याने सांगीतले होते की, ते प्लॉट, रेतीचा, दलालीचा व्यवसाय मागील एक वर्षापासुन करीत आहेत. घटने दिवशी माझे बंटी सोबत दोनदा बोलणे झाले तर तो कोणत्यातरी त्रासात असल्याबाबत मला त्याचे बोलण्यावरुन जाणवत होते मी त्याला विचारले तर त्याने काही सांगीतले नाही. मी दुपारी दोन वाजताचे नंतर त्याला फोन लावला असता त्याला फोन लागला नाही. घटनेदिवशी दि. 21/12/2021 रोजी माझा पुतण्या लखन संजय तेलंगे, अर्जुन भिमराव गायकवाड, रवी रंगलाल सर्रेआम हे वरुड येथील किरायाचे घरात हजर असतांना अंकीत बारस्कर हा घरात येवुन त्यांचे जवळ मांगट्या-पोंगट्याहो इथ हरामाच खाउन तुम्ही माजले काय, मी येवढी मोठी सर्कस चालवितो येउ दे त्याले करण मांगट्या पोंगट्याले साल्याले एका मिंटात तुम्हाले हाकलतो आहे असा बोलल्याचे मला लखन ने फोन करुन सांगीतले. 1) अंकीत ओंकारराव बारस्कर, 2) हर्षद गांजरे, 3) तेजस शिरभाते व आणखी एक व्यक्ती दाढी वाला अंकीत बारस्कर याचा मित्र मला त्याचे नाव माहीत नाही सर्व रा. वरडु सर्वांची जात (कुणबी) हे नेहमी बंटीच्या संपर्कात राहत होते. त्यामुळे त्यांनी माझा मोठा मुलगा बंटी उर्फ महेश उर्फ करण तायवाडे याला कोणतातरी मानसीक त्रास दिला त्यामुळे माझ्या मुलाने त्यांनी दिलेल्या त्रासाला कंटाळुन माझ्या मुलाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले त्यामुळे माझा मुलगा बंटी उर्फ महेश उर्फ करण तायवाडे याने आत्महत्या केली आहे. तरी माझ्या रिपोर्टवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.<br>अशी तक्रार दिलेवरुन सबब अप कलम 306,34 IPC प्रमाणे गुन्हा दाखल आहेत. | |

## लोहमार्ग नागपुर येथिल भाग ६ मध्ये दाखल गुन्हयाची माहीती

| अ.क्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता.वेळ | फिर्यादीचे नाव | मिळाला माल | आरोपी | हकीगत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपूर -28/2022 कलम 20 (B), II ( C ) NDPS ACT | रेल्वे स्टेशन नागपूर चे प्लॉटफार्म नं 03 वरील बायो टॉयलेट चे जवळ. | 12/1/2022 01/45 वा. | 12/1/2022 18/38 वा. | सरकार तर्फे RPF सहायक उपनिरीक्षक BSबघेल, वय 49वर्ष, धंदा- नौकरी नागपूर ,रा-गोधनी नागपूर.मो नं- 9503034537 | निरंक | शंकर S/O अशोक केवट, वय-33 वर्षे,रा-वार्ड नं 34 बाबा रामदास मंदिर च्या जवळ घोघर हुजूर रिवा म.प्र . अटक ता वेळ दि. १२.०१.२२ २१.२२ वा | आज रोजी आम्ही PSI भलावी स्टे डा चार्ज मध्ये हजर असतांना RPF सहायक उपनिरीक्षक बघेल रे सु ब नागपूर यांनी लेखी फिर्याद,जप्ती पंचनामा ,आरोपी तसेच एक बँग गांजा एकूण वजन10.036 किलो ग्रम व ईतर कागदपत्र दाखल करणे कामी पो स्टे ला आनून हजर केले वरून गुन्हा दाखल केला.सदर गुन्हा रे स्टे नागपूर चे प्लॉटफार्म नं 03 वरील गाडी नं 12807 विशाखापट्टनम निझामुद्दीन एक्स चे मध्ये RPF सहायक उपनिरीक्षक बघेल व स्टॉप यांनी कोच नं D/1 चेक करीत असतांना सिट नं 31 वर एक व्यक्ती लाल रंगाचे बँग सोबत संशईत स्थितीत दिसून आल्याने त्यास रे स्टे नागपूर चे बायो टॉयलेट चे जवळ 01/45 वा उतरविले.बँग चेक केली असता त्यामध्ये गांजा मिळून आला.सदर बँग मध्ये गांजा असल्याने घटनास्थळ पंचनामा केला. त्यात एकूण वजन 08,364 किलो ग्रम गांजा चा माल जप्त करण्यात आला.यातील सरकार तर्फे RPF सहायक उपनिरीक्षक BSबघेल रे सु ब नागपूर यांनी NDPS कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करून पो स्टे ला आरोपी व मुद्देमालसह कागदपत्र हजर केल्याने सबब अपराध कलम 20 (B), II ( C ) NDPS ACT प्रमाणे गुन्हा दाखल आहोत. | PSI भलावी |

## लोहमार्ग पोलीस नागपूर जिल्हयातील मर्ग बाबत माहीती

| अक्र | रेपोस्टे | मर्ग क्र व कलम | मर्ग घड जागा | मर्ग घड. ता. वेळ | मर्ग दृा. ता. वेळ | फिर्यादी/खबर देणारा नाव | मृतकाचे नाव व पत्ता | हकीकत वरुन | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **वर्धा** | 03/2022 कलम 174 जा.फौ प्रमाणे | रे.स्टे छोटी पडोली यार्ड किमी नंबर 869-B/28 जवळ | 12/01/22 08:25 वा पुर्वी | 12/01/22 19:10 वा | ऑन ड्युटी DYSS रे. स्टे बल्लरशाह तर्फे कुमारी रिता लहानु देशभ्रतार वय 30 वर्षे, धंदा– पॉइन्टसमन, राह– RBI/53/D रेल्वे कॉटर बल्लारशाह, जि. चंद्रपुर. | विजय निळकंठ तारोडे, वय 40 वर्षे, राह– मोरवा पोस्ट– तडाली ता.जि. चंद्रपुर | अशा प्रकारे आहे की, नमुद ता. वेळी व ठिकाणी ऑन ड्युटी DYSS रे.स्टे बल्लरशाह यांनी एक लेखी मेमो आणुन दिल्या वरुन गाडी क 12521 गाडी ने रन ओव्हर झाला आहे.अशा मेमो वरुन मर्ग आकस नंबर 02/2022 कलम 174 जाफौ प्रमाणे दाखल करून मयतावर पंचनामा कार्यवाही सफौ/284 रामटेके व प्रेत पहारा पोशि/1138 शेंद्रे यांना नेमण्यात आले. पंचनामा कार्यवाही दरम्यान मयताची ओळख पटली असुन सदर मयतावर PM करून प्रेत हे मयताचे नातेवाईक नामे– पार्थ विजय तारोडे यांचे ताब्यात अतःविधी करीता देवुन प्रेत ताबा पावती लिहुण घेतली. नमुद मर्ग चे कागदपत्रे दुरक्षेत्र बल्लारशाह येथुन आ.क 02/2022 कलम 174 जाफौ प्रमाणे जावक क 11/2022 दिनांक 12/01/22 अन्वये मर्ग चे कागदपत्रे आकंस प्रमाणे प्राप्त झाल्याने नमुद चा मर्ग दाखल करण्यात आला. | सफौ/284 रामटेके |

## लोहमार्ग पोलीस नागपूर जिल्हयातील मिसिंग बाबत माहीती

| अ,क | पोस्टे | मिसिंग जागा | मिसिंग ता.वेळ | मिसिंग दा. ता.वेळ | फिर्यादीचे नाव | मिंसीग व्यक्ती चे नाव व पत्ता | हकीगत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## लोहमार्ग पोलीस नागपूर जिल्हयातील अटक आरोपी बाबत माहीती

| अ.क्र. | रे.पो.स्टेचे नाव | गु.रं.नं. व कलम | अटक दिनांक व वेळ | आरोपीचे नाव |
|---|---|---|---|---|
| ०१ | नागपूर | 28/2022 कलम 20 (B), II ( C ) NDPS ACT | १२.०१.२०२२<br>२१.२२ वा | शंकर S/O अशोक केवट, वय-33 वर्षे,रा-वार्ड नं 34 बाबा रामदास मंदिर च्या जवळ घोघर हुजूर रिवा म.प्र . |